• अर्धांगिनीमध्ये *झनक झनक पायल बाजे*मध्ये गीतकार हसरत जयपुरीप्रमाणे गीतकार मजरुह सुलतानपुरी यांनी अवधी भाषेचा वापर केला होता. • *सम्राट पृथ्वीराज चौहान*मध्ये देशभक्तीपर गाणी हाच बाज होता. • *गुंज उठी शहनाई*मध्ये उस्ताद बिसमिल्लाह खाँ यांची मदमस्त शहनाई होती. • एस. एन. त्रिपाठी कवी कालिदासचे संगीतकारच नव्हे तर दिग्दर्शकही होते.

□ इसाक मुजावर

अर्धांगिनी(१९५९):

*स्कूल मास्टर, दो बहने*बरोबरच वसंत देसाईंनी संगीतबद्ध केलेला १९५९चा आणखी एक चित्रपट अमिया चक्रवर्ती यांच्या मार्स अँण्ड मुव्हीजचा *अर्धांगिनी*. १९५७ साली *कठपुतली* हा चित्रपट अर्धवटावस्थेत असताना अमिया चक्रवर्ती यांचं निधन झालं. त्यांच्यानंतर त्यांचे बंधू अजित चक्रवर्ती यांनी मार्स अँण्ड मुव्हीज ही त्यांची चित्रसंस्था पुढे चालवण्यासाठी कंबर कसली होती आणि *अर्धांगिनी* या चित्रपटाची निर्मिती करताना या चित्रपटाचे दिग्दर्शनदेखील त्यांनी केले होते. १९५१ साली वसंत देसाई यांनी संगीतबद्ध केलेला व्ही. शांताराम यांचा *अमर भूपाळी* हा चित्रपट चांगलाच लोकप्रिय ठरला होता. या चित्रपटात वसंत देसाई यांच्या संगीतात लताबाईंनी एक गाणे गायले होते. 'तुझ्या प्रीतीचे दुःख मला दावू नको रे...' या मराठी गाण्याच्या चालीवरच *अर्धांगिनी*त वसंतरावांनी एक गाणे दिले होते. 'बडे भोले हो हसते हा सुनके...' *अमर भूपाळी*तील मराठी गाणे गाणाऱ्या लताबाईंनीच हे गाणे गायले होते आणि ते *अर्धांगिनी*ची नायिका मीनाकुमारी हिच्यावर चित्रित करण्यात आले होते.


झनक झनक पायल बाजे या चित्रपटातील वसंत देसाई यांच्या संगीतातील गाण्यात गीतकार हसरत जयपुरीनी काही ठिकाणी अवधी भाषेचा प्रयोग केला होता. हाच प्रयोग गीतकार मजरूह सुलतानपुरी यांनी *अर्धांगिनी*तील वसंत देसाई यांच्या संगीतातील काही गाण्यात केला होता. लताबाईंनी गायलेले या चित्रपटात 'अपने सैया से नयना लड्डुये हमार कोई का करी' हे गाणे तर अवधी भाषेच्या अंगाने जाणारेच एक गाणे होते. 'तेरा खत लेके सनम पाव कही रखते है हम कही पडते है कदम' हे या चित्रपटातील आणखी एक गाणे लताबाईंनी एकटीने गायले होते.

तीन गाणी एकटीने गात असताना लताबाईंनी या चित्रपटातील 'प्यार में मिलना है सनम होता है तकदीर का' हे गाणे सुबीर सेनबरोबर गायले होते. लता व सुबीर सेन यांच्याबरोबरच गीता दत्त व महंमद रफी यांचा आवाजदेखील या चित्रपटात होता. पण तो फक्त द्वंद्वगीतात. 'कल साजना मिलना, यहां है तमाम काम', 'दिल हम तो हारे, तुम कहो प्यारे' व 'तुने जो उधर देखा मैंने भी उधर देखा' ही या चित्रटातील तीन द्वंद्वगीतं रफी व गीता दत्त यांच्या आवाजात होती.

सम्राट पृथ्वीराज चौहान(१९५९):

*स्कूल मास्टर, दो बहने, अर्धांगिनी*बरोबरच वसंत देसाईनी संगीतबद्ध केलेला १९५९चा आणखी एक चित्रपट म्हणजे *सम्राट पृथ्वीराज चौहान*. हा चित्रपट ऐतिहासिक होता आणि याचं भान ठेवूनच वसंत देसाईंनी या चित्रपटात देशभक्तीपर गाण्यावर भर दिला होता. 'मातृभूमी के लिए, जननी जन्मभूमी स्वर्ग से महान है' (मन्ना डे व कोरस) 'आपस की फूट से बार बार' (लता मंगेशकर व मन्ना डे), 'धन्यवाद कविचंद पुकारे' (रफी) ही या चित्रपटातील देशभक्तीपर गाणी. गीतकार भरत व्यास व संगीतकार वसंत देसाई यांनी या साऱ्या गाण्यात देशभक्तीचा आवेश अचूक पकडला होता. महेंद्र कपूरने कोरसबरोबर गायलेले एक माँझी गीतदेखील या चित्रपटात होते. या गाण्याचे बोल होते 'माँझी रे हिंमत न हार माँझी रे हिंमत न हार.'

देशभक्तीपर गाणी देत असताना वसंत देसाईंनी या चित्रपटात लता मंगेशकर यांच्या आवाजातील एक वर्षागीतदेखील दिले होते. 'ना ना ना बरसो बादल, आज बरसे नयन से जल', 'दिल पलइयो, पलटी पडी, पलटी हाथ कमान', 'छुप छुप के हमसे ना नैना मिला ओ जी' व 'ठंडी हवा आने लगी हाय जवानी बलखाने लगी' यासारखी आणखी काही गाणी या चित्रपटात होती. पण देशभक्तीपर गाणी हाच या चित्रपटाच्या संगीताचा बाज होता. आणि वसंतरावांनी तो या चित्रपटातील आपल्या संगीतात चांगलाच फुलवला होता.


बिसमिल्लाह खाँ

गुंज उठी शहनाई(१९५९):

*स्कूल मास्टर, दो बहने, अर्धांगिनी, सम्राट पृथ्वीराज चौहान*बरोबरच वसंत देसाई यांनी संगीतबद्ध केलेला १९५९चा आणखी एक सुरीला चित्रपट म्हणजे प्रकाश पिक्चर्सचा *गुंज उठी शहनाई*. शांताराम बापूंच्या *झनक झनक पायल बाजे* या चित्रपटात वसंत देसाईंनी पं. सामता प्रसाद यांच्या तबला वादनाचा प्रयोग केला होता. तर *गुंज उठी शहनाई*मध्ये बिसमिल्लाह खां यांच्या शहनाई वादनाचा हा प्रयोग तसा अभिनव होता. तरीही नवा होता असं मात्र म्हणता येणार नाही. १९४९ साली एक चित्रपट पडद्यावर आला होता *किनारा*. मधुसुदन आचार्य या चित्रपटाचे निर्माते, नायक व संगीतकार होते. त्यांनी या चित्रपटात बिसमिल्लाह खाँ यांच्या शहनाई वादनाचा प्रयोग केला होता. आणि बिसमिल्लाह खाँ यांचा फोटो प्रसिद्ध करून आपल्या या प्रयोगाची तेव्हा त्यांनी वृत्तपत्रातही जाहिरात केली होती. पण त्यांचा हा प्रयोग तेव्हा फ्लॉप

गेला होता. *गुंज उठी शहनाई*मध्ये मात्र वसंत देसाईंनी हा प्रयोग एकदम यशस्वी केला आणि बिसमिल्लाह खाँ यांची शहनाई हे या चित्रपटाचं एक खास आकर्षण ठरलं.

विजय भट्ट या चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शक होते. त्यांनी *बैजू बावरा* व *गुंज उठी शहनाई* या दोन चित्रपटांच्या संदर्भात सांगितलेला एक किस्सा येथे आवर्जून सांगण्यासारखा आहे. *बैजू बावरा* १९५२चा. त्या आधी प्रकाश पिक्चर्सने निर्माण केलेले काही चित्रपट एकदम कोसळले होते आणि प्रकाश पिक्चर्स आता बंद पडते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली होती. अशावेळी *बैजू बावरा*मधील नौशाद यांच्या



जोहराबाई



एस. एन. त्रिपाठी

संगीताने प्रकाश पिक्चर्सला एक नवा प्राणवायू दिला आणि बंद पडायला आलेल्या प्रकाश पिक्चर्सची धगधग पुन्हा सुरू झाली. हीच किमया १९५९ साली *गुंज उठी शहनाई*मधील संगीतानेदेखील करून दाखविली. या चित्रपटाच्या आधी प्रकाश पिक्चर्सने निर्माण केलेले काही चित्रपट कोसळल्यामुळे तेव्हाही प्रकाश पिक्चर्सला काहीशी घरघर लागल्यासारखी झाली होती. पण *गुंज उठी शहनाई*मधील वसंत देसाई यांच्या संगीताच्या करिश्म्याने ही घरघर थांबवली आणि प्रकाश पिक्चर्स पुन्हा उभी राहिली.

१९४९च्या बिसमिल्लाह खाँ यांची शहनाई असलेल्या *किनारा* या चित्रपटातही लताबाईंचा आवाज होता. पण या चित्रपटात त्यांच्या आवाजाला स्वतंत्र अस्तित्व नव्हतं. रामप्यारी, शांती शर्मा, जोहराबाई या गायिकांच्या आवाजाची गर्दी या चित्रपटात झाली होती. आणि या गर्दीत 'जानेवाले ये जवानी चार दिनकी है' हे एकच गाणे त्यांच्या वाट्याला आले होते. पण बिसमिल्लाह खां यांची शहनाई असलेल्या १९५९ च्या *गुंज उठी शहनाई*चे संगीत मात्र लता मंगेशकर यांच्या आवाजाने व्यापून टाकले होते. या चित्रपटात एकूण आठ गाणी होती. या आठ गाण्यांपैकी सहा गाण्यात लताबाईंचा आवाज होता.

'तेरे सूर और मेरे गीत' व 'दिल का खिलौना हाय टुट गया' ही या चित्रपटातील दोन गाणी लताबाईंच्या एकटीच्या आवाजात होती. 'जीवन मे पिया तेरा साथ रहे' व 'तेरी शहनाई बोले', 'सुनके मेरा दिल डोले' ही या चित्रपटातील दोन गाणी लताबाईंनी रफीबरोबर गायली होती. 'हौले, हौले हौले हौले घुंघट पट खोले' हे या चित्रपटातील गाणे लता व रफी यांनी कोरस-बरोबर गायले होते, तर 'अखियां भूल गई है सोना' हे गाणे लता व गीता दत्त यांनी कोरसबरोबर.

'बिखर गये बचपन के सपने' व 'मैने पिया सिख लिया' ही या चित्रपटातील दोन गाणी रफीच्या आवाजात होती. बिसमिल्लाह खाँ यांच्या शहनाईचा सूर अचूक पकडून वसंत देसाईंनी या चित्रपटातील संगीत चांगलेच खुलवले होते. यामुळे हा चित्रपट खऱ्या अर्थाने एक संगीतमय चित्रपट ठरला होता. भरत व्यासनी या चित्रपटाची गाणी लिहिली होती. नृत्यतारका जयश्री टी.च्या रूपेरी जीवनाची सुरुवात या चित्रपटापासूनच झाली. या चित्रपटात ती बालतारका होती. अनिता गुहाच्या बालपणाची भूमिका तिने या चित्रपटात केली होती.

कवी कालिदास (१९५९):

गुंज उठी शहनाई या चित्रपटातील वसंत देसाई यांच्या संगीतात एक अभिजातता होती. हीच अभिजातता जोपासणारे संगीत एस. एन. त्रिपाठींनी १९५९च्या दोन चित्रपटात दिले. यापैकी एक चित्रपट म्हणजे *कवी कालिदास*. एस. एन. त्रिपाठी या चित्रपटाचे केवळ संगीतकारच नव्हते, दिग्दर्शकदेखील होते.

१९४५ साली कालिदासांच्या मेघदूतवरील एक चित्रपट पडद्यावर आला चित्रपटाचे नाव देखील *मेघदूत*च होते. फैयाज हाश्मी यांनी लिहिलेलं 'ओ वर्षा के पहले बादल मेरा संदेशा ले जाना' हे गाणे या चित्रपटात कमलदास गुप्ता यांच्या संगीतात जगमोहनने गायले होते. आणि तेव्हा ते चांगलेच लोकप्रिय ठरले होते. या गाण्याचीच आठवण करून देणारे 'ओ आषाढ के पहले बादल जो नभ के काजल' हे गाणे १९५९च्या *कवी कालिदास*मध्ये या चित्रपटाचे गीतकार भरत व्यास यांनी लिहिले होते. आणि ते एस. एन. त्रिपाठी यांच्या संगीतात मन्ना डे व लता यांनी कोरसबरोबर गायले होते हे गाणेदेखील चांगलेच लोकप्रिय ठरले होते.

*कवी कालिदास*च्या संगीतात एस. एन. त्रिपाठींनी गायकात मन्ना डेचा आवाजच प्रमुख ठेवला होता. 'ओ आषाढ के पहले बादल' या गाण्याबरोबरच मन्ना डेने या चित्रपटातील 'दूर देख अलकापुरी जहाँ मेरी प्रिय नार' हे आणखी एक गाणे लताबाईंच्या-बरोबर गायले होते. तर 'प्रणय, विरह और मिलन की कथा सुनो अभिज्ञान शाकुंतल' हे गाणे आशाबाईंच्याबरोबर. १९५३च्या *हमदर्द* या चित्रपटात मन्ना डेने ऋतूचं वर्णन करणारे 'ऋतु आये ऋतु जाये रे सखीरी' हे गाणे अनिल विश्वास यांच्या संगीतात लताबाईंच्याबरोबर गायले होते. याच गाण्याची आठवण करून देणारे परंतु वर्णन करणारे एक गाणे *कवी कालिदास*मध्ये मन्ना डेने एस. एन. त्रिपाठी यांच्या संगीतात गायले होते. या गाण्याचे बोल होते. 'नये नये रंगोसे ग्रीष्म महिने मे कामिनीया धुप लगे कुम्हलाए'. रफीने या चित्रपटात लताबाईंच्याबरोबर एकच गाणे गायले होते. 'प्रीतीके बंधन में बंधी, उनपर कौन करे विश्वास.'

'नागेंद्र हाराया, मैं तो जगमना की प्यासी रे' व 'शाम भई घनश्याम न आए' ही या चित्रपटातील दोन गाणी लताबाईंच्या आवाजात होती. तर 'दूर देश से कोई सपेरा आया' हे एक गाणे गीता दत्तच्या आवाजात. 'जिसे बनाया सेवनहारा, आज की रात' हे या चित्रपटातील नृत्यगीत सविता बॅनर्जी व उषा मंगेशकर यांच्या आवाजात होते.

एस. एन. त्रिपाठींनी या चित्रपटातील एकजात साऱ्या गाण्यांची बैठक शास्त्रीय संगीताची ठेवली होती. ●